जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUL 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

# अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन




कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज):

महाराष्ट्राचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आज त्यांच्या पवित्र स्मृतींना प्रतिमापूजनाने अभिवादन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांच्या हस्ते अजित अनंतराव पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर, उपस्थितांनीही पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. उत्तम सकट, गजानन पळसे, अजित चौगुले, डॉ.अजित कोळेकर, डॉ.धनंजय सुतार, डॉ. शिवराज थोरात, डॉ.मचंछिंद्र गोफणे, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, अनिल साळोखे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 3 JUL 2026
जनप्रवास

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन



**जनप्रवास : कोल्हापूर**

महाराष्ट्राचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात बुधवारी त्यांच्या पवित्र स्मृतींना प्रतिमापूजनाने अभिवादन केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते अजित अनंतराव पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, कै. शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. उत्तम सकट, गजानन पळसे, अजित चौगुले, डॉ. अजित कोळेकर, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शिवराज थोरात, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, अनिल साळोखे आदी होते.

23 JUL 2026

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात अजित पवार यांना अभिवादन

कोल्हापूर : माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना प्रतिमापूजनाने अभिवादन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते अजित अनंतराव पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थितांनीही पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. उत्तम सकट, गजानन पळसे, अजित चौगुले, डॉ. अजित कोळेकर, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शिवराज थोरात, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. नेहा वाडेकर, डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, अनिल साळोखे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

2 3 JUL 2026
सकाळ

# अजित पवार यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर, ता. २२ : महाराष्ट्राचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आज त्यांच्या पवित्र स्मृतींना प्रतिमापूजनाने अभिवादन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते अजित अनंतराव पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, उत्तम सकट, गजानन पळसे, अजित चौगुले, अजित कोळेकर, धनंजय सुतार, शिवराज थोरात, मच्छिंद्र गोफणे, नेहा वाडेकर, कबीर खराडे, सुरेश बंडगर, अनिल साळोखे उपस्थित होते.

2 3 JUL 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. डॉ. सेलुकर यांच्या 'इलेक्ट्रॉनिक मतदान टर्मिनल' डिझाईनला पेटंट मंजूर

## विद्यापीठ प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्याकडून शुभेच्छा :, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळेचे सहकार्य



डॉ. शार्दुल सेलुकर यांचे अभिनंदन व भावी वाटचालीस शुभेच्छा देताना शिवाजी विद्यापीठ प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव.

**जनप्रवास : कळे**

मतदान प्रक्रियेला अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानस्नेही बनविण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या "बहु-प्रमाणीकरण इलेक्ट्रॉनिक मतदान टर्मिनल" (Multi-Authentication Electronic Voting Terminal) या अभिनव औद्योगिक रचनेला भारत सरकारच्या पेटंट, डिझाईन्स आणि व्यापारचिन्ह महानियंत्रक कार्यालयाकडून डिझाईन पेटंट मंजूर झाले आहे.

या अभिनव डिझाईनचे संशोधक प्रा. डॉ. शार्दूल माणिकराव सेलुकर प्राध्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, काळे आणि सौ. मैथिली शार्दूल सेलुकर हे आहेत. या अभिनव मतदान टर्मिनलच्या रचनेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मतदान प्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि वापरकर्ता-अनुकूल करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. बहु-प्रमाणीकरण संकल्पनेवर आधारित या डिझाईनमध्ये मतदाराच्या ओळखीची पडताळणी करण्यासाठी विविध प्रमाणीकरण सुविधांचा विचार करण्यात आला असून, सुरक्षित मतदान व्यवस्थेसाठी उपयुक्त अशी आकर्षक व कार्यक्षम औद्योगिक रचना विकसित करण्यात आली आहे. भविष्यात निवडणूक व्यवस्थापन, शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था तसेच विविध लोकशाही प्रक्रियांमध्ये अशा प्रकारच्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा उपयोग होऊ शकतो.

या डिझाईन पेटंटमुळे संशोधकांच्या नाविन्यपूर्ण विचारांना राष्ट्रीय स्तरावरील बौद्धिक संपदा संरक्षण प्राप्त झाले असून, संशोधन, नवोपक्रम आणि स्वदेशी तंत्रज्ञान विकासाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. अशा संशोधनातून देशातील तांत्रिक प्रगतीला चालना मिळण्याबरोबरच सुरक्षित व आधुनिक डिजिटल मतदान प्रणाली विकसित करण्यासाठीही प्रेरणा मिळणार आहे.

या यशाबद्दल शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातून प्रा. डॉ. शार्दूल माणिकराव सेलुकर आणि सौ. मैथिली शार्दूल सेलुकर यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील संशोधन व नवोपक्रमासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

सदर संशोधन कार्याची प्रेरणा त्यांना शिवाजी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू, डॉ रजनीश कामत आणि प्र. कुलगुरू डॉ ज्योती जाधव यांच्याकडून मिळाली,असे त्यांनी सांगितले.

या कार्यात त्यांना श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ पणुत्रेचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटील आणि विठ्ठलराव पाटील महाविद्यालय कळेचे प्राचार्य डॉक्टर वाय. बी. गोंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन प्राप्त झाले तसेच महाविद्यालयातील सर्व स्टाफचे सहकार्य लाभल्याचेही सांगितले.

2 3 JUL 2026

सकाळ

# राज्यपालांनी क्रीडा संचालकांशी साधला संवाद

कोल्हापूर : राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी राज्यातील सर्व राज्य विद्यापीठांमधील क्रीडा विभागप्रमुख आणि क्रीडा संचालकांशी दूरस्थ पद्धतीने संवाद साधला. अतिशय स्पर्धात्मक झालेल्या खेळांमध्ये व्यावसायिकता आली आहे. हे लक्षात घेऊन विद्यापीठांनी खेळ व क्रीडा प्रकारांना पोषक वातावरण तयार करून देशासाठी उत्तमोत्तम खेळाडू निर्माण करावेत. समर्थ व शक्तिशाली राष्ट्र बनविण्यासाठी खेळ हा महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्राकडे क्रीडा विकासाची मोठी ताकद आहे. राज्याने अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविले आहेत. विद्यापीठांनी खेळांमध्ये ग्रामीण, आदिवासी युवकांनाही सहभागी होण्यास प्रेरित करावे. विद्यापीठांनी महाविद्यालय, विद्यापीठस्तरावर 'स्पोर्टस् इकोसिस्टिम' तयार करावी, असे आवाहन राज्यपाल वर्मा यांनी केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. मनोज रेड्डी यांनी सादरीकरण केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUL 2026 पुढारी

# 'कॅरीऑन' विद्यार्थ्यांची ४ ऑगस्टपासून परीक्षा; आजपासून अर्ज भरता येणार

## सर्किट बेंचच्या आदेशाने शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २७ अभ्यासक्रमांतील ३ हजार १४६ विद्यार्थ्यांना दिलासा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कॅरीऑन मिळालेल्या (विशेष प्रवेश संधी) विद्यार्थ्यांसाठी ४ ऑगस्टपासून परीक्षा घेण्यात येणार असून त्याकरिता परीक्षा अर्ज भरण्याचे वेळापत्रक बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने जाहीर केले. त्यानुसार या विद्यार्थ्यांना आजपासून अर्ज भरता येणार आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने याबाबत दिलेल्या आदेशाने कोल्हापूर, सांगली व सातारा या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील २७ अभ्यासक्रमांतील ३ हजार १४६ विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम.बी.ए., विधी आदी २७ अभ्यासक्रमांच्या कॅरीऑन मिळालेल्या विद्यार्थ्यांपैकी काहींनी सर्किट बेंचमध्ये धाव घेतली होती. त्यावर मंगळवारी



आदेश देताना न्यायालयाने या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास परवानगी दिली. विद्यापीठ आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाने विद्यार्थ्यांसाठी या परीक्षांचे फेरनियोजित करण्याचे आदेश दिले. यामुळे या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी मिळणार असून त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार नाही.

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांची उन्हाळी सत्राची २०२६ पूर्वपरीक्षा खास बाब म्हणून घेण्याबाबत तसेच ती एकदाच घ्यावी असा निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदने घेतला. या परीक्षेसाठी येणाऱ्या खर्चाचा विचार करून प्रतिविद्यार्थी दोन हजार पाचशे रुपये इतके परीक्षा शुल्क आकारावे. ही परीक्षा विद्यापीठातर्फे घ्यावी तसेच पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे मूल्यमापन विद्यापीठात करावे, असा निर्णय परिषेदने घेतला.

या सर्व पार्श्वभूमीवर बुधवारी विद्यापीठ प्रशासनाने या परीक्षेसाठी अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर केले. तसे पत्र कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थेचे संचालक, विद्यापीठातील अधिविभागप्रमुखांना बुधवारी (दि. २२) देण्यात आले. त्यानुसार दि. २३ ते दि. २७ जुलै या कालावधीत विद्यार्थ्यांना अर्ज भरता येणार आहे. दि. २७ रोजी महाविद्यालय, अधिविभाग यांना परीक्षा शुल्क जमा करावे लागणार आहे. दि. २८ रोजी परीक्षा अर्जाच्या याद्या जमा कराव्या लागणार आहेत.

...विद्यापीठ, कोल्हापू...
2 3 JUL 2026
तरूण भारत

# 'कॅरी ऑन'अंतर्गत प्रवेश अर्ज भरण्यास प्रारंभ

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विशेष प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मार्च, एप्रिल २०२६ (उन्हाळी सत्रातील) परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यास आजपासुन प्रारंभ होत आहे. उच्च न्यायालय, मुंबई यांचे सर्किट बेंचच्या अंतरिम आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विशेष प्रवेश संधी अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मार्च/ एप्रिल, २०२६ मधील परीक्षेचे आयोजन करण्यात येत आहे. सदर परीक्षेचे परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवार दि. २३ ते दि. २७ जुलैपर्यंत मुदत आहे. दि. २८ रोजी महाविद्यालय व अधिविभागांनी परीक्षा याद्या जमा करायच्या आहेत. यानंतर मंगळवार दि. ४ ऑगस्ट रोजी परीक्षा होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या प्री. एक्झाम विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

2 3 JUL 2026

लोकमत

# 'कॅरी ऑन'मधील विद्यार्थ्यांच्या चार ऑगस्टपासून परीक्षा

## आजपासून परीक्षेचे अर्ज भरता येणार; मुदतवाढ नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विशेष प्रवेश संधी (कॅरी ऑन) अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या मार्च/एप्रिल २०२६ (उन्हाळी सत्र) परीक्षेसाठीचे अर्ज भरण्याची प्रक्रिया जाहीर केली आहे. चार ऑगस्टपासून परीक्षांना प्रारंभ होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच येथे दाखल याचिकेनंतर २१ जुलै २०२६ रोजीच्या अंतरिम आदेशानुसार विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे.

संबंधित विद्यार्थ्यांना आज, गुरुवारपासून परीक्षा अर्ज भरता येणार आहेत. परीक्षा अर्ज भरण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.



### परीक्षेचे वेळापत्रक असे..

परीक्षा अर्ज भरण्याची मुदत : २३ ते २७ जुलै

परीक्षा शुल्क : २,५०० (प्रतिविद्यार्थी)

परीक्षा प्रारंभ : ०४ ऑगस्ट २०२६

2 3 JUL 2026

लोकमत

# सभा, आंदोलनांसाठी विद्यापीठ परिसरात पूर्वपरवानगी अनिवार्य

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरामध्ये शैक्षणिक, संशोधन, परीक्षा व प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने यापुढे विद्यापीठ परिसर, इमारती, मैदाने किंवा विद्यापीठाच्या अखत्यारीत असलेल्या कोणत्याही जागेमध्ये कोणत्याही सभा, मोर्चे, आंदोलने, उपोषणे, निदर्शने करण्यापूर्वी विद्यापीठ प्रशासनाची लिखित परवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या स्वाक्षरीने हे परिपत्रक बुधवारी काढण्यात आले.

विद्यापीठ क्षेत्रात कोणतीही सभा, धरणे, उपोषण, आंदोलन, मोर्चा, निषेध नोंदवणे, निदर्शने करणे, घोषणाबाजी अथवा निवेदन देणे यांसारख्या उपक्रमांसाठी प्रशासनाची लेखी परवानगी आवश्यक राहील.